# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

क्र. 1464/शि.वि./2014 दि. 9/01/2014.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– पल्स पोलिओ लसीकरण मोहिम करीता दि.19 जानेवारी 2014 (रविवार) ला शाळा सुरू ठेवण्याबाबत.**

**संदर्भ :–** 1) आरोग्य विभाग पत्र क्र. 1129 / वै.अ. / प.पो.का. दि.3.01.2014 चे पत्र.
2) आ.अ. / 1136 / नो.वै.अ. / प.पो.का. दि. 06.01.2014 चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्या येते की, राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम दि. 19 जानेवारी 2014 ला राबविण्यात येत आहे. याकरीता आपल्या शाळेत पल्स पोलिओ चे बुथ लावण्याकरीता जागा उपलब्ध करून दयावी. तसेच भौतिक सुविधा उपलब्ध करून स्वच्छतेकडे लक्ष दयावे. उपरोक्त दिवशी शाळेतर्फे चतुर्थ श्रेणी कर्मचारी हजर ठेवावा. या मोहिमेची प्रसिध्दी करण्यास्तव आपल्या शाळेतील दर्शनी भागात सुचनाफलकावर पल्स पोलिओ मोहिमेबाबत लिहून ठेवावे. शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या घराच्या आजुबाजुला राहणाऱ्या 0 ते 5 वयोगटातील बालकांच्या पालकांना पोलिओ डोस मुलांना पाजण्याबाबत प्रवृत्त करण्यास सांगावे. जेणेकरून पोलिओ आजार निर्मूलन करण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून आपला भारत देश पोलिओ मुक्त करण्यास सहकार्य करावे.

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1. मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर.
2. नोडल वैद्यकीय अधिकारी, पल्स पोलिओ कार्यक्रम, म.न.पा., नागपूर.

PC:2/D:\Tembhurne sir \ Letter 1.doc